# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

जा. क्र. उमपा/नरवि/बांप/४२/२१/५३१
उल्हासनगर महानगरपालिका
उल्हासनगर-३.
दिनांक:- १०/१२/२०२१.

**बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र**

प्रति,
श्री. दिपक माजी व इतर
सिटीएस नं. २०९४७ ब्लॉक नं. ए-४७०/९३९
शिट नं २३ उल्हासनगर- ४,

विषय:- सिटीएस नं. २०९४७ ब्लॉक नं. ए-४७०/९३९
शिट नं २३ उल्हासनगर- ४,येथील जागेवरील बांधकाम परवानगी बाबत.

संदर्भ:- आपला वास्तुविशारद श्रीम शिवानी सताळे यांचेमार्फत सादर केलेला
बांधकाम परवानगी चा प्रस्ताव दि ०६/०७/२०२१ टोकन क्रमांक
४१२१०७०६०००००७

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ :- सिटीएस नं. २०९४७ ब्लॉक नं. ए-४७०/९३९ शिट नं २३ उल्हासनगर- ४, येथील जागेमध्ये २०९ चौ. मी. भुखंडाचा विकास करावयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक ०६.०७.२०२१ रोजीच्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या २०९ चौ. मी. जागेत तळमजला +५ मजले रहिवासी वापराच्या इमारतीस बांधकाम पारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

## अटी

१. बांधकाम परवानगी दिल्याचे तारखेपासून एक वर्ष पर्यत वैध असेल. नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नुतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहिल. अशा प्रकारचे नुतनीकरण फक्त तीन वर्ष करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पूर्ण करणे आवश्यक आहे, नुतनीकरण करतांना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात असलेल्या नियमांच्या व नियोजित विकास आराखडया अनुषंगिक छाननी करण्यात येईल.
२. नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.
३. मा. जिल्हाधिकारी ठाणे, यांच्याकडून बांधकाम चालू करावयाचे अगोदर बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी तुमच्यावर राहिल व बिनशेतीच्या परवानगीची एक सत्य प्रत काम सुरु करण्याचे पंधरा (१५) दिवस अगोदर महापालिकेकडे पाठविणे आवश्यक राहील.
४. बांधकाम सुरु करण्यापूर्वी सात (७) दिवस आधी महापालिका कार्यालयात कळविण्यात यावे.
५. ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमिनी व्यतिरिक्त जमिनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.
६. बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशा प्रमाणे आणि घालून दिलेल्या अटीप्रमाणे करता येईल.
७. जोत्या पर्यत बांधकाम झाल्यावर वास्तुविशारदने दाखल्यासह मंजूर नकाशा प्रमाणे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र, महापालिकेस सादर करण्यात यावे. त्यानंतर प्रत्यक्ष जागेवर तपासणी करुन महापालिकेच्या दाखला प्राप्त करुन घेऊन नंतरच जोत्यावरील बांधकाम करावे.
८. प्लॉटचे हद्दीतील इमारती भोवतील मोकळया सोडवयाचे जागेत बदल करु नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.
९. बांधकामात कोणत्याही फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये. तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची बांधकाम परवानगी रदद् झाली असे समजण्यात येईल.
१०, इमारतीच्या बांधकामची सुरक्षितेची (स्ट्रक्चरनल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपल्या



Scanned with CamScanner

पक्या स्वरुपाची गटारे बांधावीत.

३१. बांधकामासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी नळाचे कनेक्शन मिळणार नाही त्यासाठी बोअरवेलचे काम करावे लागेल.

३२. भूखंडासमोरील रस्ता पक्या स्वरुपात तयार केल्याखेरीज वापर परवाना मिळणार नाही.

३३. स्टीलाचा वापर हा वाहनतळ म्हणूनच करावा तसेच तो बंदिस्त करता येणार नाही व त्याची उंची बीम बॉटम पासून २.४० मी. एवढीच असावी.

३४. इमारतीच्या हद्दीत कचरा-कुंडी बाधून त्याबाबतची आवश्यक तो देखरेख व स्वच्छता राखण्यात यावी.

३५. आय. एस. आय. कोड नं. १८९३ आणि ४३२६ नुसार भुकंप प्रवण विरोध स्तरावरील शक्तीनुसार नियोजित इमारतीची सरंचना करणे व त्यानुसार बांधकाम मजबुती बाबतचे सर्टिफिकीट/प्रमाणपत्र जोडण्याचे व वापर परवाना वेळी दाखल करणे ही जबाबदारी वास्तुविशारद यांचे वर राहील.

३६. इमारतीचे बांधकाम करतांना वर्षा संचयनाची (रेन वॉटर हार्वेस्टिंग) व्यवस्था करणे आपल्यावर बंधनकारक राहील.

३७. इमारतीची उंची १५ मी. पेक्षा जास्त असल्यास, इमारतीत अग्निशमन विभागाने सुचीत केल्याप्रमाणे उपाययोजना करणे आपल्यावर बंधनकारक राहील.

३८. प्रकरणांसोत सादर केलेली कागदपत्रे अथवा माहिती खोटी किंवा दिशाभुल करणारी आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार/वास्तुविशारद/परवानाधारक अभियंता / जमीन मालकांची राहील.

३९. प्रस्तावांसोबत प्राप्त कागदपत्रांचे आधारे या कार्यालयातर्फे मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. उक्त कागदपत्रांचे विधी ग्राह्यतेबाबत संबंधित जागा मालक/विकास अधिकारी पत्रधारक/वास्तुविशारद/सल्लागार अभियंता इत्यादी जबाबदार राहील.

४०. इमारतीमध्ये सौर उर्जेची व्यवस्था करणे आपल्यावर बंधनकारक राहील.

४१. जोत्या प्रमाणपत्र घेण्यापूवी अग्निशमन विभागाचे ना हरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल तद्नंतर पुढील बांधकाम सुरु करावे.

बांधकाम परवानगी मंजूर करणा-याची सही व हुददा:-

कनिष्ठ अभियंता
नगररचना विभाग

नगररचनाकार
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत:-

१. उप आयुक्त (अ.बां.नि.वि.), उल्हासनगर महानगरपालिका.
२. उप आयुक्त/सहा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.
३. उप आयुक्त, कर निर्धारण व संकलक, उल्हासनगर महानगरपालिका.



Scanned with CamScanner